http://www.swaroopyog.net

स्वामी माधवानंद (डॉ. माधव नगरकर) ह्यांचे ह्युस्टनचे कार्यक्रम

सैषा गणेशविद्या |

बुद्धिदाता गणपती हे सर्वांचे आवडते, विद्या आणि वैभव देणारे दैवत. गणपती अथर्वशीर्षातील मंत्रांचा भावार्थ, गणेश मंत्रांचा सूक्ष्म अर्थ, आणि सगुण उपासना यांचे विवरण; सुंदर आणि अपरिचित गणेश कथांसह करीत आहेत स्वामी माधवानंद.

याबरोबरच गणेश धुन, गणेश नाममंत्र पठण, आणि भक्तिपदांचे अप्रतिम गायन श्रवण करण्याचा योग.

पदगायक: डॉ. अश्विन रोडे, गौरी पाटणकर-पोतदार, डॉ. अतुल दीक्षित
साथीला: अमित भागवत (तबला), डॉ. बिद्युत घोष (मंजिरा)

कधी: शनिवार, मार्च २६, २०१६ **वेळ:** ३:३० ते ५:३० तदनंतर अल्पाहार
प्रवेश: विनामूल्य. आपली अमूल्य उपस्थिती प्रार्थनीय आहे.
स्थळ: Vedanta Society of Greater Houston, 14809 Lindita Drive, Houston (http://houstonvedanta.org)

संपर्क: अनिल रोडे anil.g.rode@gmail.com (281-795-8934) शोभा कुलकर्णी shobha_kulkarni@yahoo.com (281-575-0094)

ध्यान-सत्संग

स्वामी माधवानंद गीता व योग शास्त्रावर आधारित व नाथसंप्रदाय परंपरेतून सिद्ध झालेल्या ध्यान-प्रक्रियेचे विवरण, प्रात्यक्षिक मार्गदर्शन, व तदंतर्गत शंकानिवारण करतील. स्वामीजींच्या सत्संगात आपण थोडे वेळ ध्यान करू.

कधी : **रविवार, मार्च २७, २०१६** **वेळ:** सकाळी ८:०० ते ९:०० तदनंतर अल्पाहार
स्थळ : The Rode residence, 3418 Stoney Mist Dr., Sugar Land, Texas 77479 (near SW fwy & Hwy 6)

संपर्क: अनिल रोडे anil.g.rode@gmail.com (281-795-8934, 281-265-8313(L))

कार्यक्रमाच्या ठिकाणी उपलब्ध

स्वामी माधवानंद यांचा नुकताच प्रकाशित झालेला **अमृतधारा-काव्यार्थविवरण** हा *स्वामी स्वरूपानंद* (पावस, रत्नागिरी) यांना साक्षात्कार काळात स्फुरलेल्या साक्यांवरील विवरणाचा सुंदर ग्रंथही उपलब्ध असेल. स्वामी स्वरूपानंदांच्या सर्वांग-विकसित व्यक्तिमत्त्वाचे आणि आध्यात्मिक वाटचालीचे दर्शन घडवणारा हा ग्रंथ सर्वांनी संग्रही ठेवावा असा आहे.

तसेच **जय हेरंब** ही audio CD पण उपलब्ध असेल. ह्या CD मध्ये *मनोज ताम्हणकर* (कॅलिफोर्निया) यांनी रचलेली आणि संगीतबद्ध केलेली गणेशभक्तिपर पदे बहुतांशी *रघुनंदन पणशीकर* व *राहुल देशपांडे* ह्या सुप्रसिद्ध गायकांनी गायलेली आहेत. ह्यातीलच पदे ह्युस्टनच्या कार्यक्रमामध्ये गायली जाणार आहे.

स्वामी माधवानंद - व्यक्तिपरिचय

स्वामी माधवानंद हे आदिनाथांपासून ज्ञानेश्वर महाराज व पुढे स्वामी स्वरूपानंद (पावस) यांच्याकडून स्वामी माधवनाथ (पुणे) यांच्यापर्यंत चालत आलेल्या नाथसंप्रदायाच्या ध्यानयोगप्रधान शाखेचे एक उत्तराधिकारी आहेत.

पूर्वायुष्यात स्वामी म्हणजे डॉ. माधव न रकर यांनी पुण्यातील आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट येथून Mycology (कवकशास्त्र) मध्ये संशोधन केले. त्यावर त्यांना पुणे विद्यापीठाची Ph.D. डिग्री प्राप्त झाली. १९८७-८८ मध्ये डॉ. नगरकरांनी अमेरिकेतील स्मिथसोनियन रिसर्च इन्स्टिट्यूट येथे postdoctoral fellowship मिळवून संशोधन केले. पुढे त्यांनी ब्रिटीश म्युझियम ऑफ नॅचरल हिस्ट्री (लंडन) आणि म्युनिक बोटॅनिकल गार्डन (जर्मनी) येथे ही या विषयात काम केले.

१९९६ साली स्वामीजींनी 'स्वरूपयोग प्रतिष्ठान' (http://swaroopyog.net) या संस्थेची स्थापना केली.

तरुण वयापासून ध्यानयोग साधना, संशोधनपर वृत्तीमुळे योगप्रक्रियेचे अंतरंग, मध्यवर्ती सूत्र आकलन करून घेऊन Science of Meditation या पुस्तिकेद्वारे ती प्रसिद्ध केली.

योगसूत्रे, गीता-ज्ञानेश्वरी, दासबोध ह्या ग्रंथांवरील प्रबोधने, राष्ट्रपुरूषांची जीवनचरित्रे आणि त्यातील प्रेरणा सर्वांपर्यंत पोहोचवून त्यांना स्वाध्याय आणि ध्यानयोगासाठी प्रवृत्त करणे, त्यासाठी युवा केंद्रे व शिबिरे घेणे हे स्वामी माधवानंद यांच्या कार्याचे विशेष अंग आहे. आज स्वामी आणि साधकवर्गाने डोंगरगाव, मुळशी येथील गिरिवनात स्वरूपयोगाश्रम उभारला आहे. प्राचीन ऋषींच्या आश्रमांच्या धारणा प्रत्यक्षात आणण्याच्या उद्देशाने हा प्रयत्न आहे.

रामायण-महाभारत व इतर पुराण-कथांतील वर्णनाचा पसारा आणि अतिशयोक्ती टाळून, त्यांना वास्तवाच्या जवळ आणून त्यातील वाङ्मयसौंदर्य, बोध आणि प्रेरणात्मक संदेश यांचे दर्शन घडविणे हे स्वामी माधवानंद यांचे खास वैशिष्ट्य आहे.

शास्त्रीय संशोधन क्षेत्रात दोन तपे संशोधन कार्य केल्यामुळे लाभलेल्या शास्त्रीय दृष्टिकोनामुळे त्यांचे विवेचन आधुनिक पिढीला रुचणारे असते.

संतांचे काव्यसौंदर्य आणि त्यातील सूक्ष्म भावार्थ यांची उकल करून दाखविणे हा विशेष कार्यक्रम ते देशात-परदेशात करीत असतात. देशात-परदेशात युवा गायकांसह गीत-भावतरंग कार्यक्रम, BMM Atlanta आणि BMM Philadelphia मध्ये केलेले कार्यक्रम रंगले. अमेरिकेत सॅन फ्रॅन्सिस्को, फिनिक्स, ह्युस्टन, ऑरलॅण्डो, सिनसिनॅटी, क्लीव्हलॅण्ड, न्यू जर्सी, वॉशिंग्टन, शिकागो, डेट्रॉईट, तसेच कॅनडात टोरांटो येथे गीत-भावतरंगाचे अनेक कार्यक्रम झाले आहेत.

